# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 28 / 03 / 2024

| अ क. | पोलीस स्टेशन | गु.र.नं व कलम | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | दत्तापुर | 162 / 2024 कलम 324, 504, 506 भादवी | पारधी बेडा जळगांव आर्वी | 27 / 03 / 24 चे 19 / 00 ते 19 / 15 वा | 27 / 03 / 24 चे 21 / 06 वा | शैलेश गणेश भोसले वय 38 रा पारधी बेडा जळगांव आर्वी | अजय आयलान पवार 32 जात पारधी रा पारधी बेडा जळगांव आर्वी | फिर्यादी व आरोपी शेजारी राहतात फिर्यादीकडुन आरोपीने मागील महिन्यात उसनवारीने 500 रुपये घेतले होते ते उसनवारीचे पैसे फिर्यादीने मागीतले असता आरोपीने शिवीगाळ केली व बांबुची लाकडी काठी हातात घेवुन डावे कपाळावर मारुन जख्मी केले त्यामुळे जखम होवुन रक्त निघाले या नंतर जर मला पैसे मागीतले तर मारण्याची धमकी दिली अशा जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | सरमसपुरा | 94 / 24 कलम 379 भादवी | चमक खु अचलपुर | 26 / 03 / 2024 वेळ रात्री 12.00 / 01.30 वा | 27 / 03 / 24 चे 21 / 37 वा | सुनंदा प्रल्हाद नेवारे वय 49 वर्श रा चमक खु | राहुल प्रकाश सोळंके वय 25 वर्श रा चमक खु | फि हा दि 26 / 03 / 24 चे रात्री झोपले असता रात्री 12 / 00 ते 01 / 30 वा दरम्याने बक–यांचा ओरडण्याचा आवाज आल्याने उठले असता आरोपी हा फि चा बोकुड काळया रंगाचा दोन वर्शाचा किमत 12000रू आरोपी मोटर सायकलने घेवुन पळुन जाताना दिसला |
| 3 | दर्यापुर | 184 / 2024 कलम 324.325. भादवि | लेहंगाव शेत शिवार ता. दर्यापुर | 26 / 03 / 2024 चे 15 / 00 दरम्यान | 27 / 03 / 2024 चे 18 / 56 वा | अजय मुदगलराव पतींगे वय 44 वर्ष रा. खुर्चनपुर लेहगाव ता. दर्यापूर | सतीष बाळकृष्ण मात्रे रा. लेहगाव | फिर्यादी शेतात जेवण करून गेले असता शेतातील हरब–याच्या शेतात चार ते पाच ढोर हे हरबरा खात असंताना दिसून आले फि यांनी आरोपीस म्हटले की माझे हरबराचे नुकसान होत आहे तुझे ढोरे माझे शेतातून दूसरी कडे घेवून जा असे म्हटले असता आरोपी हा फिर्यादी जवळ जावून म्हटले की माझे ढोर तुझे शेतात आले नाही असे म्हणून वाद केला त्याचे हातातील काठी ही फी ला मारली असता ती काठी फी चे नाकावर लागली त्यामुळे फी च्या नाकाला जखम होवुन रक्त निघाले अशा फिर्यादीयांचे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टि आणून दाखल केल्या वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला` |
| 4 | आसेगाव | 97 / 24 कलम 324,504 ,506, भादवी | ग्राम सावळापुर | 26 / 03 / 24 चे 20.30 वा ते 21.00 वा. दरम्यान | 27.03.24 चे 01.58 वा. | सौ.मंगला रामकीशण नांदणे , वय 35 वॅश, जात भोइ, धंदा मजुरी, रा. सावळापुर | रामकीशण नांदणे वय 42 वॅश, रा. सावळापूर | ,फी ही नमुद स्थळी आपले परीवारासह राहते व मजुरीचे काम करते तीचे पती हे नेहमी दारू पीण्याचे सवईचे असुन नेहमी वाद वीवाद करतो नमुद घ.ता.वेळी फी ने कुलर दुरूस्ती करीता मॅकेनीक ला बोलावले होते तो कुलर दुरूस्त करून नीघुन गेल्यावर नमुद आरोपीने फी ला म्हटले की तो का इथे आला होता वरून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देवुन लाकडी मोगरीने डोक्यात मारले तर जखम होवुन रक्त स्त्राव झाले अशा फी चे जबानी रीपोर्ट वरून सदर गुन्हा दाखल करण्यात आला. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | बेनोडा | 78 / 24 कलम 324, 504, 506 भादवी | बेलोना | 27 / 03 / 24 चे 12 / 00 वा ते 12 / 30 वा दरम्यान | 27 / 03 / 2024 चे 17 / 20 वा | दिनेश शामरावजी सहारे वय 50 वर्श रा बेलोना | सागर दिनेश सहारे वय 19 वर्श रा बेलोना | फिर्यादी हा घरी बाजीवर आराम करीत असताना फिचा मुलगा सागर सहारे हा घरी आला व फी ला म्हणाला मला 2000 रू पाहीजे फिर्यादिने दिले नाही म्हणुन आरोपीने शिवीगाळ केली व लोंखडी सलाख डोक्यावर मारली त्यामुळे फिर्यादिचे डोक्याचे रक्त निघाले अशा फिचे जबानी रिपोर्ट वरून व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला . |
| 6 | चांदुर रेल्वे | 174 / 24 कलम 324 504 506 34 भादवी | ग्राम पहसखेड | 26 / 3 / 24 चे 17 / 00वा ते 17 / 15 वा दरम्यान | 27 / 3 / 24 चे 14 / 45 वा | सचिन भिमराव ढेंबर वय 37 वर्श रा पळसखेड ता चांदुर रेल्वे | 1 धिरज नवरामजी ढगे वय 35 वर्श<br>2 विनोद नवरामजी ढगे वय 38 वर्श<br>3 मनोज नवरामजी ढगे वय 40 वर्श | यातील आरोपी क्रमांक 1 याने फी च्या अंगावर गाडी नेली व फी ला जख्मी केले वरुन फी ने माझया अंगावर गाडी का आनली असे महटले असता आरोपी क्रमांक 2 व 3 यांनी दुधाच्या रिकाम्या कॅन नी व लाथा बुक्यांनी मारुन जख्मी केले अशा फी चे जबानी रि वरुन गुन्हा नोंद करन तपासात घेतला |
| 7 | तिवसा | 148 / 2024 कलम 498 अ, 504,506 34 भादवी | सुकळी वनारसी ता जि अमरावती 60 किमी पश्चिम | 01 / 11 / 2022 ते दि 25 / 04 / 2023 . | 27 / 03 / 2024 चे 20.33 वा. | सौ वय 25 बर्ष | 1. रोशन बाबाराव काळे वय 28 वर्ष<br>2. बाबाराव काळे वय 50 वर्ष<br>3.सौ सुनंदा बाबारावजी काळे वय 48 वर्ष<br>4. सुरज बाबाराव काळे वय 26 वर्ष सर्व रा सुकळी वनारसी ता जि अमरावती | अर्जदार हिचे लग्न सन 2018 रोजी आरोपी क 1 सोबत रितीरिवाजाप्रमाणे झाले होते परंतु मागील 02 ते 03 वर्षापासुन अर्जदार हिस 2022 पर्यत मुलबाळ होत नसल्या कारणाने आरोपी क 1 याने फि.चे डॉ मसानकर हॉस्पीटलमध्ये उपचार केला उपचाराचे पैसे काय तुझे बाप देणार का याबाबत तिला मारहाण करुन शिवीगाळ करून तु कुठे ही निघुन जा असे म्हणुन तिला थापडयाबुक्याने मारहाण केली तसेच आरोपी क 1,2,3, व 4 यांनी फि हिचा मानसिक शाररिक त्रास देवुन तुझया बडिलांनी हुडां दिला नाही असे म्हणुन मानसिक छळ करून जिवाने मरण्याच्या धमकया दिल्यावरून फि च्या जबाणी रि वरुन गुन्हा नोंद .. |
| 8 | तळेगाव द | 99 / 24 कलम 363 भादवी | ग्राम शेंदुंजना खुर्द फिर्यादीचे राहते घर | 26 / 03 / 2024 चे 06 / 30 वा | 27 / 03 / 2024 चे 00 / 42 वा | सौ वय 39 वर्श | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी यांनी पोलिस स्टेशनला येवुन जबानी रिपोर्ट दिला कि, त्यांची मुलगी नामे कु वय 16 वर्श 9 महीने हि दि 26 / 03 / 24 रोजी सकाळी 06 / 30 वा घरून निघुन गेली परत आली नाही नातेवाईकांनाकडे शोध घेतला मिळुन आली नाही. फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 9 | लोणी | 96 / 24कलम 461, 380 भादवी | टाकळी शेतशिवार | 25 / 3 / 24 चे 17.30 वा ते 27 / 03 / 24 चे 15,00 वा दरम्यान | 27 / 3 / 24 चे 19 / 32 वा | अमित चंदुलालजी बिहुरे वय 43 रा महाविर नगर नवाथे प्लॉट अमरावती | अज्ञात इसम | हकिकत अशा प्रकार आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोराने फिंर्यादीचे शेतातिल खोलीच्या दरवाजाचे कुलुप कोंडा तोडुन खोलीत ठेवलेले गव्हाचे 16 कटटे किं अंदाजे 16000 रू चे व चण्याचे 03 कटटे किं अंदाजे 5000 रू तसेच इन्वटर बॅटरी कि अंदाजे 5000 रू ची असा एकुण 26000 रू चा माल अज्ञात चोराने चोरूण नेला अशा फिंयादीच्या जबानी रिंर्पोटवरूण सदरचा गुन्हा दाखल करूण तपासात घेतला |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | चांदुर बाजार | 208 / 2024 कलम 379 भादवि | ग्राम तुळजापुर गढी ता. चांदुरबाजार | 27 / 03 / 24 चे 15 / 30 वा दरम्यान | 27 / 03 / 24 चे 21 / 38 वा | सरतर्फे गौरव पुसदकर बनं. 2445पोस्टे चांदरबाजार | एम.एच.14 ए एच 1080 ट्रक्टर चा चालक अनोळखी ईसम | हकिकत अशा प्रकारे आहे की मिळालेल्या गुप्त बातमीवरुन नमुद घतावेळी व ठिकाणी यातील नमुद अनोळखी फरार आरोपी याचेवर रेड केली असता नमुद अनोळखी आरोपी हा गौण खनीज काळी रेती चोरी करीत असल्याचे दिसला पोलीसांची चाहुल लागताच ट्रक्टर ट्रॉली तेथेच थांबवुन पळुन गेला पंचासमक्ष सदर ट्रक्टर ट्रॉलीची पाहणी केली असता एक लाल रंगाचा ट्रक्टर महींद्रा 585 डी आय सरपंच कंपनीचा मुंडाचा चेसीस नं MAHINDRA006505439C1 ट्रॉलीच्या मागच्या खालील बाजुला पिवळया रंगाच्या पटटीवर एम.एच.14 ए एच 1080 असा क.नमुद आह अशा वर्णनाचा की.अंदाजे 5 लाख रु चा व काळी रेती एक ब्रास कि.अंदाजे 4000 रु असा एकुन 504000 पाच लाख चार हजार रु चा माल मिळुन आला वरुन सदरचा गुन्हा मा. ठाणेदार सा.यांचे आदेशाने दाखल करुन तपासात घेतला. |
| 11 | मोर्शी | 140 / 24 कलम 379 भादवी | सालबर्डी 08 किमी उत्तर | 10 / 03 / 24 चे 14 / 00 ते 18 / 00 दरम्यान | 27 / 03 / 24 चे 17 / 50 वा | कृश्णा काशीरावजी कुरवाडे वय 33 वर्श,रा.शामजी पंत तळेगाव ता. आश्टी जि. वर्धा | अज्ञात | फि ची मो सा क एम एच 32 एबी 8660 अशी काळया रंगाची त्यावर पांढ–या लाल रंगाचा पंटटा असलेली कि.अं.40,000 / – रु ची शाईन होंडा कंपनी ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| 12 | तिवसा | 146 / 24 कलम 379 भादवी | पंचवटी चौक तिवसा झुनका भाकर केंद्र समोर | 27 / 03 / 24 चे 10 / 00 वा | 27 / 03 / 24 चे 13 / 57 वा | अमोल बाबाराव रिठे वय 39वर्ष रा वरुडा | अज्ञात | फिर्यादी हे मोट र सायकला चाबी लावुन नास्ता करणेकरिता गेले असता कोणी तरि अज्ञात इसमाने फि ची मोसा चोरुन नेली आहे अशा फिर्यादीच्या जबाणी रि सदरचा गुन्हा नोंद |
| 13 | तिवसा | 147 / 24 कलम 279,304 अ भादवी | तळेगाव फाटयाजवळ हायवे रोडवर | 27 / 03 / 2024 चे 12 / 30 वा. दर. | 27 / 03 / 2024 चे 17 / 32 वा. | लालचंद बापुराव तिडके वय 53 वष्र धंदा शेती जात कलार रा तळेगाव ठाकुर | हिरकणी बस क एम एच 14 के क्यु 6604 चा चालक नामे संजय डिवरू खोब्रागडे वय 52 वर्षे धंदा चालक भंडार आगार रा इंदिरा नगर सावरी जवाहर नगर भंडारा | यातील नमुद फिर्यादी याचा पुतण्या नामे प्रफुल तिडके रा तळेगाव ठाकुर याचा साळा मूतक नामे वासुदेव घनश्याम फटींग वय 35 वर्ष रा लोधीखेडा ता सौसर जि छिंदवाडा मध्यप्रदेश हा तळेगाव येथे बहिणीकडे आला होता तो एच एफ डिलक्स मो सा क एम एच 27 डीएफ 2807ने मोझरी येथे काही कामानिमित्त जात असता तिवसा कडुन अमरावती कडे जाणारी हिरकणी बस चा चालक आरोपी याने भरघाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन त्याला तळेगाव फाटयाजवळ ठोस मारून जख्मी केले व तो उपचारा दरमयान मरण पावला अशा फिय्रदीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता